Exh.18
Order
Seen.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE Date: 2026.07.06 17:30:06 +0530

किं.कि. अर्ज नं 84/2026

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो जयसिंगपूर
यांचे कोर्टात.

सागर अरविंद कांडेसर — अर्जदार
विरुध्द
महाराष्ट्र शासन — वि.प.

यातील अभियोग पक्षातर्फे म्हणणे असे कि,

1) अर्जदार यांनी त्यांचे अर्जातील कलम 3 मधील अ.नं 1 ते 31 मधील वित्तिय संस्था मधील कर्ज खाते खुले करुन मिळणेबाबत मागणी केलेली आहे. सदर खातेशी गुन्हा रजि नं 7/2026 हा महा. सावकारी (नियमन) अधि नियम 2014 चे कलम 352, 351(2) प्रमाणे गुन्ह्याशी संबंधीत असलेचे दिसून येते.

2) सदर खातेशी गुन्ह्यातील एकुण 27 तोळे सोने व 1509 gm. चांदीपैकी 9 तोळे सोने व 150 gm चांदी असे मौल्यवान वस्तुंचा समावेश असून सदर गुन्हा हा गंभिर स्वरुपाचा आहे.

3) सदर गुन्ह्यातील काही दागिने जप्त करणेत आले असुन उर्वरित दागिने बाबत तपास करुन जप्त करणेचे बाकि आहे.

4) यातील मुख्य आरोपी हा अर्जदार असुन गुन्हा दाखल झालेपासुन फरारी आहे सदर अर्जदार याने बरेच लोकां कडून मौल्यवान वस्तू / दागिने हे तारण घेवुन ते पुन्हा स्वतःचे विविध वित्तीय संस्था व नातेवाईकांचे नावे विविध वित्तीय संस्थेमध्ये कर्ज खाते काढुन दागिने तारण म्हणून ठेवलेले आहेत. त्याबाबत तपास बाकि आहे.

5) अर्जदार यांनी त्यांचे आई, वडिल, व नातेवाईक यांचे नावे इतर लोकां कडून दागिने तारण घेवुन त्यांना विविध वित्तिय संस्थेमध्ये सदरचे दागिने तारण ठेवून कर्ज खाते काढलेचे तपासी अधिकारी यांना निष्पन्न झालेले आहे.

6) सदर कर्जखाते बाबत विविध वित्तीय संस्थामध्ये तपास होवुन सदर लोकाय बेशरि कर्ज काढलेली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) सदर खालेमधील सोन्याचे दागिने हे मुळ मालकांना परत मिळणे आवश्यक आहे.

8) सदर अर्जदार यांचे कर्ज खातेतील दागिने हे फिर्यादी व अन्य मालक असले लोकां कडून तारण घेतलेचे तपासी अधिकारी यांना निष्पन्न झालेले आहे.

9) सदर अर्जदार यांचे मागणीप्रमाणे कर्जखाते खुले केल्यास अर्जदार हे गैरवापर करून दागिने सोडवून घेणेची व बाकी त्याची विल्हेवाट लावण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे त्याचे मुळ स्वरुपात बदल होवून भविष्यात ओळख निश्चितीचा प्रश्न उद्भवू शकतो.

तरी सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा ही विनंती

जयसिंगपूर
ता. 6/7/2026

मे डा. ध्रावे
(signature)
APP